# कार्यावली

## गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१२ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : राज्यपालांचे अभिभाषण.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव

**तीन** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**चार** : प्रश्नोत्तरे

**पाच** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**सात** : सन २०१२-२०१३ चा अर्थसंकल्प सादर करणे.

**आठ** : सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**नऊ** : सन २०११-२०१२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**दहा** : सन २०११-२०१२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**अकरा** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा** अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**चौदा** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**पंधरा** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**सोळा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**सतरा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**अठरा** : उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

**एकोणीस** विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करणे.

**वीस** : आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**एकवीस** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**बावीस** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**तेवीस** : शासकीय विधेयक (प्रलंबित)-

(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे.

सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०११

(ब) विधानसभेने संमत केलेल्याप्रमाणे - विचार,खंडशः विचार व संमत करणे - (चर्चा पुढे सुरू) -

सन २०११ चे वि.स.वि.क्रमांक ४३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०११

**चोवीस** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंचवीस** : शोक प्रस्ताव

**सव्वीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**सत्तावीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये

**अठ्ठावीस** : अशासकीय विधेयके विचारार्थ (प्रलंबित)-

१) सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - चर्चा पुढे सुरु
२) सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०११. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे
३) सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११ श्री.विजय सावंत, वि.प.स. यांचे
४) सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे

**एकोणतीस** : अशासकीय ठराव (म.वि.प.नियम १०२ अन्वये)

**श्री.संदिप बाजोरिया यांचा ठराव क्रमांक १,२,३,४ व ५**

(१) '' विदर्भातील हातमाग विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, परिणामी होत असलेली आर्थिक दुरावस्था व हलाखीचे जीवन, त्यात सुधारणा होण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, ''

(२) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त झालेले शेतकरी पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे वंचित राहत असणे. याला शंभर वर्षे जुनी बिट्रीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भुमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.परशुराम उपरकर यांचा ठराव क्रमांक ६,७,८,९**

(६) '' सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सिंधुदूर्ग व विजयदुर्ग हे दोन्ही किल्ले व त्यांच्या तटबंदीवर केंद्राच्या पुरातत्व खात्याची मालकी आहे व किल्ल्याच्या आतील जमिन खाजगी मालकीची आहे, त्यामुळे या ऐतिहासीक वास्तूंचे जतन करताना तांत्रिकदृष्टया अडचणी निर्माण होतात, त्या अडचणींवर कायम स्वरुपी मार्ग काढण्याच्यादृष्टीने राजस्थान व गुजरात या राज्यांप्रमाणेच केंद्र शासनाने हे किल्ले राज्य शासनाच्या ताब्यात देऊन "अ" वर्गाचे राष्ट्रीय स्मारक घोषित करावे. तसेच या किल्ल्यांना पाहण्यासाठी जागतिक पातळीवरील पर्यटकांची वाढ होईल अशा दृष्टीने राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७) " सिंधुदूर्ग व कोल्हापूरला जोडणाऱ्या आंबोली घाटात असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, रस्त्यांच्या बाजूने असलेली निकृष्ट दर्जाची संरक्षक भिंत, अनेक ठिकाणी कठडे नसणे, साईनबोर्डस् तसेच साईडपट्टयांचा अभाव असणे, संपूर्ण घाटाची झालेली दुरावस्था, परिणामतः या घाटात सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली जिवीतहानी व वित्त हानी, या सर्व बाबी विचारात घेता आंबोली घाटाचे चौपदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या घाटात दोन नवीन पर्यायी मार्ग सुरु करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८) '' मुंबई-गोवा महामार्ग क्र.१७ चार पदरी होण्याकरिता सातत्याने होत असलेली मागणी, दोन राज्य जोडणारा व पर्यटनदृष्टया महत्वाचा असणारा हा महामार्ग चारपदरी होण्यास विलंब होत असून या महामार्गावर गेल्या दोन वर्षात मोठया प्रमाणावर झालेल्या अपघातात हजाराहून अधिक लोकांचे झालेले मृत्यू, अनेकजण जखमी होणे व कोटयावधी रुपयांचे वाहनांचे झालेले

अपरिमित नुकसान, सदर अपघाताच्या घटना टाळण्यासाठी व या महामार्गाचे पर्यटनदृष्टया महत्व लक्षांत घेऊन हा महामार्ग चौपदरी करण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९) "इयत्ता १० वी, १२ वी करिता पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, मुंबई या ठिकाणी स्वतंत्र परिक्षा बोर्ड असून कोकणातील चार जिल्हयांकरिता स्वतंत्र परिक्षा बोर्ड निर्माण करण्याची शासनाने वारंवार घोषणा करुनही स्वतंत्र परिक्षा बोर्ड स्थापन न झाल्याने व मुंबईसारख्या शहरी विभागाच्या बोर्डाला संलग्न असल्याने या चार जिल्हयातील विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन कोकणाकरिता स्वतंत्र परिक्षा बोर्ड स्थापन करण्यात यावे, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."

**डॉ.दिपक सावंत यांचा ठराव क्रमांक ११,१२**

(११) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१२) '' राज्यातील रुग्णांना भासणारी रक्ताची निकड आणि रक्तदानाचे महत्व विचारात घेवून सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान होणे गरजेचे आहे. यासाठी रक्त संक्रमण परिषदेने फक्त रक्तदान दिवस साजरा न करता त्यांना विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा व त्यासाठी विशेष समिती नेमून त्यांचे नियंत्रण करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

**श्री.दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक १५,१६,१८,१९**

(१५) '' राज्य शासनाने अधिकारी / कमर्चारी यांच्या बदल्याबाबत अधिनियम केला आहे, बदली करण्यात आलेले काही अधिकारी/ कर्मचारी राज्य शासनाच्या आदेशाविरुध्द मॅटमध्ये जातात. बदली आदेशास स्थगिती मिळवितात. सदर स्थगितीच्या कालावधीत बदली केलेले अधिकारी/ कमर्चारी वर्षानुवर्षे पूर्वीच्याच जागेवर राहतात. त्यामुळे बदल्याबाबतचा कायदा परिणामशून्य होतो. परिणामी बदल्यासंदर्भात केलेल्या अधिनियमाखालील हेतू सफल होत नाही व अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत हे विचारात घेवून शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१६) '' "औरंगाबाद महानगरपालिकेने ४ जानेवारी, २०११ रोजी औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याबाबत बहुमताने संमत केलेला ठराव, तसेच यापूर्वीही १९ जून, १९९५ रोजी महानगरपालिकेने संमत केलेल्या ठरावानुसार तत्कालीन राज्य शासनाने त्याला दिलेली मान्यता, तसेच औरंगाबाद जिल्हा परिषदेने दि.२५ जानेवारी, २०११ रोजी "औरंगाबाद जिल्हा परिषदेचे" संभाजीनगर जिल्हा परिषद असे नामांतर करण्याचा संमत केलेला ठराव विचारात घेता, "औरंगाबाद शहराचे व जिल्ह्याचे" नाव "संभाजीनगर" करण्यात यावे, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. "

(१८) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, याचप्रमाणे, राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१९) '' राज्यातील शिक्षणाच्या गरजेनुसार ८००० मराठी शाळांच्या मान्यतेसाठी असलेली मागणी, शासनाच्या दिरंगाईच्या धोरणामुळे मराठी माध्यमाच्या बंद पडत चाललेल्या शाळा, परीणामी मराठी भाषा व मराठी शाळांचे अस्तित्व व भवितव्य धोक्यात येणे, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे व मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू नयेत, तसेच ८००० शाळांना विनाविलंब मान्यता देण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा ठराव क्रमांक २०,२१,२४**

(२०) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२१) '' राज्यात महिलांवरील अत्याचारांचे वाढत असलेले प्रमाण, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे देखील वाढत चाललेले प्रमाण, परिणामत: महिलांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पोंलीस यंत्रणाही असे गुन्हे रोखण्यात अपयशी ठरणे, याबाबी विचारात घेवून महिलांवर व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२४) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.रणजित पाटील यांचा ठराव क्रमांक २५,२६,२७**

(२५) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२६) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२७) '' विदर्भातील विशेषतः अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, येथील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**श्री.संजय केळकर यांचा ठराव क्रमांक ३१, ३२**

(३१) " राज्याची वाढती लोकसंख्या व त्यात परराज्यातून सतत येणा-या लोंढयांची सातत्याने पडत असलेली भर, त्यामुळे राज्याचे विस्कळीत होणारे नियोजन, त्यातून निर्माण होणा-या अनेकविविध समस्या, वाढती बेरोजगारी पिण्याचे अपुरे पाणी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर पडणारा अनावश्यक ताण, शिक्षणाची होत असलेली दुरावस्था, निवा-याचा प्रश्न परिणामी राज्याची विस्कळीत होत असलेली अर्थव्यवस्था इत्यादी बाबी लक्षात घेऊन शासनाने परराज्यातून अनधिकृतपणे येणारे लोंढे रोखण्यासाठी धडक कार्यक्रम आखून तो अनिवार्यपणे युध्द पातळीवर राबवावा व त्यासाठी विशेष उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

(३२) '' शासनाने मागील अनेक वर्षापासून ठाणे शहराच्या जमिनीचा सर्व्हे न करणे, ठाणे शहरात बांधकामाची झालेली व होत असलेली प्रचंड वाढ, तथापि, अशाप्रकारे झालेल्या बांधकामाची जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद नसणे, त्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, गरजू नागरिकांना मागणी करुनही नोंदी उपलब्ध नसल्यामुळे मालमत्ता प्रमाणपत्र प्राप्त न होणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, ठाणे शहराला नोंद नसलेल्या बांधकामांपासून वाचविण्यासाठी व शासनाच्या महसूलात वाढ होण्यासाठी ठाणे शहरातील जमिनीचे सर्वेक्षण करण्याकरिता खास अभियान तातडीने राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक ३५,३६,३७,३८ व ३९**

(३५) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३६) '' "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वाशिष्ठी नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वाशिष्ठी नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३७) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३८) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३९) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयवंतराव जाधव यांचा ठराव क्रमांक ४०,४१,४२, ४३ व ४४**

(४०) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४१) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) " नाशिक हे राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबईच्या धर्तीवर "नाशिक नगर विकास प्राधिकरण" कार्यान्वीत करुन हया प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४३) '' राज्यातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, ॲपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोटयावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अरुण गुजराथी यांचा ठराव क्रमांक ४५,१४२,१४३,१४४ व १४५**

(४५) '' महाराष्ट्रात रोजगार हमी योजना अनेक वर्षापासून सुरु असून त्यात ग्रामीण विभागातील कामे करण्यात येतात, सदर योजनेचे धोरण हे ग्रामीण भागामतील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन राष्ट्रीय मालमत्तेची निर्मिती करणे हे आहे, महाष्ट्राच्या या योजनेला अनुसरुनच केंद्र शासनाने नेरगो ही योजना सुरु केली आहे, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात

मजूरांची उपलब्धता कमी होत आहे. त्याचप्रमाणे मजूरीचे दरही वाढलेले आहेत. तसेच कोरडवाहू अल्पभूधारकाला शेती परवडत नाही. या सर्व बाबी लक्षात घेवून अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामांचा समावेश रोजगार हमी योजनेमध्ये करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४२) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४३) '' खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४४) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी बिट्रीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४५) '' राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.राम पंडागळे यांचा ठराव क्रमांक ४६,४७**

(४६) '' औरंगाबाद जिल्हयात अंजिठा व वेरुळ येथे गौतम बुध्दाच्या जगप्रसिध्द लेणी आहेत गौतम बुध्दाच्या या लेणी पाहण्यास व त्यावर अभ्यासासाठी देशातील लाखो बौध्द बांधव व इतर लोक येत असतात तसेच विदेशातील लाखो लोक या लेण्याचा अभ्यास करण्यासाठी व लेण्या पाहण्यासाठी येत असतात. जगाला शांततेचा मार्ग दाखविण्याऱ्या व जगभर बौध्द धर्माचा प्रसार व प्रचार करणाऱ्या या महामानवाचे नाव चिरंतन स्मरणात रहावे यासाठी औरंगाबाद येथील चिकलठाणा विमानतळाला "तथागत गौतम बुध्द विमानतळ" असे नाव देण्यासाठी राज्या शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४७) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्त्यव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. आताही राजगृहात डॉ.आंबेडकरांच्या वापरातील वस्तु ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर, या दिवशी या माहामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "चैत्यभूमी" रेल्वे स्थानक असे नामकरण करावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून असलेली मागणी विचारात घेऊन दादर रेल्वे स्थानकाला "चैत्यभूमी" रेल्वेस्थानक असे नामकरण करण्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती उषाताई दराडे यांचा ठराव क्रमांक ४८,५१,५२**

(४८) '' राज्यातील महिला बचत गटांना सक्षम करुन त्यातून उत्पन्न होणाऱ्या रोजगाराची संधी वाढविण्यासाठी शासनातर्फे महिला बचत गटांना शुन्य टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यांत यावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१) '' महाराष्ट्र राज्यातील समाजसुधारक व ऐतिहासीक महापुरूष उदा.राजर्शी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, महर्षी कर्वे, आनंदीबाई जोशी, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जिजामाता इत्यादी महापुरूषांची चरित्रे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत छापून माफक दरात सर्व सामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावीत अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५२) '' राज्यातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ५३,५५,९९,१००**

(५३) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५५) '' राज्यातील सर्व माध्यमाच्या (इंग्रजी वगळून) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून व महाविद्यालयामधून उच्च प्रतीचे व गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी

त्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना व महाविद्यालयांना अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्विकारावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(९९) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१००) '' राज्यातील मराठवाडा व विदर्भ तुलनात्मक दृष्टया मागासलेले विभाग असल्याने त्यांच्या विकासाच्या दृष्टीने खामगाव-जालना-बीड-उस्मानाबाद- सोलापूर या नवीन रेल्वे मार्गाच्या कामाचा सर्व्हे करुन त्वरित मंजूर करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.प्रकाश बिनसाळे यांचा ठराव क्रमांक ५६,५७**

(५६) '' राज्यात विशेषतः ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी "शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५७) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हेमंत टकले यांचा ठराव क्रमांक ५९,६०,६१,६२ व ७८**

(५९) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(६०) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली

भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६२) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७८) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयप्रकाश छाजेड यांचा ठराव क्रमांक ६३,६४,११८,११९ व १२०**

(६३) '' शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कायमस्वरुपी ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६४) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११८) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल

विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११९) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२०) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामनाथ मोते यांचा ठराव क्रमांक ६८,६९**

(६८) '' राज्यातील विविध विभागांच्या (आदिवासी, सामाजिक न्याय, ग्रामविकास इ.) प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचे नियंत्रण करण्यासाठी एकच विभाग असावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९) '' राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन प्रभावीपणे होण्यासाठी सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्तालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामदास कदम यांचा ठराव क्रमांक ७०,७१,७२,७३**

(७०) '' कोकणात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७२) '' कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन्ही जिल्हयांमध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते पाणी तसेच कोयना धरणातील पाणी जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी पुरविण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७३) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रमेश शेंडगे यांचा ठराव क्रमांक ७४,७५,७६,७७**

(७४) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५) '' '' शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७६) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन

करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.चंद्रकांत पाटील यांचा ठराव क्रमांक ७९,८०,८१,८२ व ८३**

(७९) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८०) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(८१) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८२) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८३) '' महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस भीक मागणाऱ्यांची वाढती संख्या, मूलभूत हक्कांपासून वंचित राहिल्यामुळे त्यांना भीक मागावी लागणे, याच असहाय्यतेचा गैर फायदा उठवून निर्माण झालेल्या व्यावसायिक टोळया, याबाबतीत असलेल्या क्लिष्ट व अपुऱ्या तरतूदी, यासर्व बाबी मानवतेच्या दृष्टीकोनातून विचारात घेवून त्यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने विधानमंडळाच्या सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अनिल भोसले यांचा ठराव क्रमांक ८५,८६,८७,८८**

(८५) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८६) '' पुणे शहरात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने वाहतुकीची होणारी कोंडी, अपघातात होत असलेली वाढ, यामुळे पुणे शहाराच्या वाहतुकीचा झालेला जटील प्रश्न, याबाबत पुणे शहाराच्या गतिशीलतेसाठी सर्वकष आराखडा तयार करुन त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(८७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८८) '' मानवतेचे महाभाष्याकार असलेल्या श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या "श्री ज्ञानेश्वरी" च्या सप्तशताब्दी वर्षाचे औचित्य साधून उचित स्मारक व्हावे व त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नेवासे परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाने एक कालबध्द योजना आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.किरण पावसकर यांचा ठराव क्रमांक ८९,९०,९१,९२ व ९३**

(८९) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(९०) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण

झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९२) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९३) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.दिपकराव साळुंखे यांचा ठराव क्रमांक ९४,९५,९६,९७ व ९८**

(९४) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी यांच्यात निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९७) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्याठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करणे यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्प कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९८) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सुभाष चव्हाण यांचा ठराव क्रमाक १०१**

(१०१) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारताची घटना लिहिली असून त्यांची किर्ती संपूर्ण जगात पसरलेली आहे. भारतीय जनतेचे त्यांच्यावर अतिशय प्रेम आहे. भारतीय जनतेचे लाडके नेते डॉ.बाबासाहेब आबेडकर हे दादर येथील हिंदू कॉलनीतील राजगृह येथे राहत होते. दादर याच ठिकाणी त्यांचे स्मारक असून त्यांच्या वापरातील अनेक मौल्यवान वस्तू तेथे ठेवण्यात आलेल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर, या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी याठिकाणी येत असतात. अशा या महामानवाचे नाव देशातील सर्व जनतेच्या चिरंतर स्मरणात राहण्यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वे स्थानक असे नामकरण करण्यासाठी राज्यातील सर्व अनुयायी यांनी अनेक वर्षांपासून करण्यात आलेल्या मागणीचा विचार होऊन दादर रेल्वे स्थानकाला "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर" असे नामकरण करण्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.भगवान साळुंखे यांचा ठराव क्रमांक १०२,१०३,१०५**

(१०२) '' शिक्षण क्षेत्रात सर्व स्तरावर सुसंवाद राहून शैक्षणिक धोरण परिणामकारकरित्या राबविण्यासाठी आपल्या राज्यातील शालेय शिक्षण अधिपत्याखालील पूर्व प्राथमिक, प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक संवर्गावर नियंत्रण करणारी सर्व कार्यालये एकाच छत्राखाली आणावीत, अशा शिफारस ही विधानपरिषद केंद्र शासनास करीत आहे. ''

(१०३) '' पूर्व प्राथमिक शाळांसाठी नियमावली लागू करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, त्यात समान अभ्यासक्रमाची तरतूद , शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, सेवा विषयक नियमावली, याबाबी समाविष्ट करण्याची आवश्यकता, तसेच या शाळेच्या गुणक्ता विषयक तपासणी व त्यांच्यावर नियंत्रणाची आवश्यकता तसेच पूर्व शिक्षणाचे आर्थिक धोरण इत्यांदीवर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे, सध्या पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे पालकांचे आर्थिक शोषण मोठया प्रमाणात सुरु आहे, शासनाने पूर्व प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यावी व त्यासाठी आर्थिक तरतूदीसह प्राथमिक शिक्षणाप्रमाणे सर्व यंत्रणा उभा कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०५) '' महाराष्ट्र छात्रसेना ही माध्यमिक स्तरावरील इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण देणारी देशातील पहिली व एकमेव योजना आहे या योजनेच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता आहे, तसेच ही योजना काही

निवडक विद्यार्थ्यांसाठी मर्यादित न ठेवता इयत्ता ८ वी व ९ वी मध्ये शिकणाऱ्या सर्वच मुला-मुलींसाठी लागू करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.केशवराव मानकर यांचा ठराव क्रमांक १०७,१०८,१०९**

(१०७) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, ॲपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोटयावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०८) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०९) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सतीश चव्हाण यांचा ठराव क्रमांक ११०,१११,११२,११३ व ११४**

(११०) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत पध्दतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१११) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११२) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्य शासनाने राज्यात पांदण रस्ता

दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजनांचा राज्य शासनाच्या योजनेत समाविष्ट करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११३) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११४) '' राज्यात सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुन सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची पुरेशी संधी प्राप्त होत नाही. दिवसेंदिवस वाढती महागाई विचारात घेता बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणे, आवश्यक आहे. तथापि, सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलावणे (कॉल) येत नाही म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे सतत ३ वर्षे बेरोजगार राहणाऱ्या पदवीधर उमेदवारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता म्हणून देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**प्रा.सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक ११५,११६,११७**

(११५) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११६) '' राज्यातील बांधकामासाठी लागणाऱ्या विटा,खडी,रेती,सिमेंट व स्टील इत्यादी बांधकाम साहित्याच्या अमर्यादीत वाढलेल्या किंमती व रेतीच्या अचानक उद्‌भवलेल्या तुटवडयामुळे राज्यभरातील इमारती, रस्ते, शासकीय कार्यालयांची बांधकामे, इत्यादी विकास कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे राज्यातील बांधकाम व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्यांची नियंत्रित दरात मुबलक प्रमाणात उपलब्धता व्हावी यासाठी अभ्यास गट नेमून कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११७) '' राज्यातील ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी राजीव गांधी घरकुल योजना राबविण्यात येत असून या योजनेला बँकाँमार्फत चांगला प्रतिसाद मिळत नसल्याने शासनाच्या या समाजोपयोगी योजनेला खीळ बसण्याची शक्यता विचारात घेऊन ही योजना लाभार्थ्यांकडून एकही पैसा न घेता १००% राज्य शासनामार्फत राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.नीलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक १२१**

(१२१) "बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, २००० अनुसार देशातील सर्व

मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. परंतु सदर कायद्याची माहिती राज्यातील बहुतेक पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिका-यांना नाही. प्रत्येक जिल्हयात पोलिसांचे जिल्हा पातळीवर विशेष बाल पथके नियुक्त करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे राज्यात बालकांवरील अत्याचारांची संख्या दिवसेंदिवस बाढत जाणे व देशात महाराष्ट्र राज्य तिस-या स्थानावर आहे. त्यामुळे सदर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे व काटेकोरपणे करण्यात यावी आणि बालहक्क आयोगास आर्थिक सहाय्य करुन तो सक्षम करण्यात यावा, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."

**श्री.राजन तेली यांचा ठराव क्रमांक १२३,१२४,१२५,१२६ व १२७**

(१२३) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२४) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(१२५) '' राज्यातील विशेषतः ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांत सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्द पातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२६) '' राज्यातील अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती दिप्ती चवधरी यांचा ठराव क्रमांक १२८,१२९,१३०,१३१**

(१२८) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२९) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. ''

(१३०) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३१) '' जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.सुधीर तांबे यांचा ठराव क्रमांक १३३, १३४, १३५,१३६**

(१३३) " राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. "

(१३४) '' राज्यातील लोकसंख्येत अपंगांचे ३ टक्क्याहून अधिक प्रमाण आहे. यात बरेच मूकबधीर अपंग आहेत. या अपंगांना योग्य शिक्षण मिळत नाही. यामुळे अपंग शिक्षणापासून वंचित राहतात त्यामुळे या अपंगांना भविष्यात विशेष असे स्थान मिळत नाही. त्याचप्रमाणे ते स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासही असमर्थ ठरतात. अपंग शिक्षणापासून वंचित राहू नयेत व भविष्यात त्यांचा विकास व्हावा म्हणून शासनाने त्यांच्यासाठी विशेष योजना आखावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३५) '' "राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्याचे वितरण सुरळीत होत नसल्यामुळे राज्यातील नागरिकांकडून तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येणे, सबब, सर्वसामान्य जनतेत शासनाच्या सदर योजनेसंदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेवून तिचे

निवारण करण्यासाठी शासनाकडून स्वस्त धान्य दुकानदारांना वेळेवर व नियमित अन्नधान्याचा पुरवठा करणे व तो सर्वसामान्य जनतेपर्यंत स्वस्त अन्नधान्य दुकानाच्या माध्यमातून विहित व मुबलक प्रमाणात वितरीत करण्यासाठी शासनाने राज्यातील मागणी व उपलब्ध साठा याचा ताळमेळ घेवून वितरण व्यवस्थेत सुसूत्रीकरण आणण्यासाठी अभ्यास समिती नेमावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३६) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक १३८,१३९,१४०,१४१**

(१३८) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३९) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४०) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४१) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात

आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोंडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री. धनंजय मुंडे यांचा ठराव क्रमांक १५०,१५१,१५२**

(१५०) महाराष्ट्रातील थोर संत श्री शिरोमणी नरहरी महाराज यांचे कार्य समाजउध्दारासाठी प्रेरणादायक आहे. त्यांच्या कार्याचा प्रसार होणे हे समाजाच्या दृष्टीने भूषणावह आहे. त्यामुळे श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे टपाल तिकीट काढण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१५१) राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्या सोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थंलातरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी शासकीय वस्तीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(१५२) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नौकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, याबाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांनं पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नौकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**तीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**एकतीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.